क्र.लाप्रवि/मुख्यालय/अे-३/झेरॉक्स मशिन/(वा.दे.क.)/प्रसिध्दी/०४/२०१०/ 2406
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई, वरळी पोलीस कॅम्प, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई-४०० ०३०.
दि. १६/०३/२०२६.

**-: दरपत्रकाबाबतच्या सुचना :-**

**विषय :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म,राज्य, मुंबई या कार्यालयातील दोन झेरॉक्स मशिनचा वार्षिक देखभाल करार करण्याबाबत.**

******

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई मुख्यालय या कार्यालयाकरिता कोनिका मिनाल्टो मॉडेल नं. बिझहब-२०६ या कंपनीच्या दोन झेरॉक्स मशिनचा वार्षिक देखभाल करार करण्याकरिता सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे इच्छुक पुरवठादार कंपनीकडून कमीत कमी दराची दरपत्रके मोहरबंद पाकीटामध्ये मागविण्यात येत आहेत. सदर वार्षिक देखभाल कराराबाबतची कॉम्प्रेहेन्सिव्ह (Comprehensive) किंवा नॉन-कॉम्प्रेहेन्सिव्ह (Non-Comprehensive) तत्वावरची तपशिलवार माहिती देवून तसे दरपत्रक या कार्यालयास सादर करावीत. याबाबत अटी व शर्ती सविस्तर तपशील पुढीलप्रमाणे आहे.

--००अटी व शर्ती०००---

१. कॉम्प्रेहेन्सिव्ह किंवा नॉन-कॉम्प्रेहेन्सिव्ह दराबाबत सीलबंद दरपत्रके दि. २३/०३/२०२६ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये सायंकाळी १८.१५ वा पर्यंत कार्यालयात जमा करावी. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

२. मोहोरबंध लिफाप्यांवर झेरॉक्स मशिन याबाबत वार्षिक देखभाल करार असे लिहिणे आवश्यक आहे. एका पुरवठादारास एकच निविदा सादर करता येईल.

३. दरपत्रक फॉर्मवर दरपत्रक धारकाची सही व शिक्का असणे बंधनकारक आहे.

४. दरपत्रक मोहोरबंध लिफाफे उघडतेवेळी दरपत्रधारक स्वत: किंवा त्याचा एक प्रतिनिधी स्वखर्चाने उपस्थित राहू शकतो.

५. दरपत्रक कागदपत्रात कुठेही खाडाखोड/ ओव्हरराईटिग (गिरवणे) पांढरी शाई लावणे टाळावे. चुकुन तसे करावे लागल्यास त्यावर पूर्ण स्वाक्षरी करावी.

६. दरपत्रक धारक कंपनीने या कार्यालयातील अधिकाऱ्यांबरोबर हितसंबंध नसल्याबाबत आणि एकच निविदा दिल्याबाबतचे हमीपत्र दरपत्रकासोबत दयावे.

७. कोणतेही एक अथवा सर्व दरपत्रके नाकारण्याचा, संपूर्ण प्रक्रिया पूर्णपणे किंवा दरपत्रक स्वीकृतीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता थांबविण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार, हे कार्यालय राखून ठेवत आहे.

८. दरपत्रके दि. २४/०३/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर पोलीस अधीक्षक मुख्यालय यांचे दालनात उघडण्यात येतील.

९. दरपत्रके स्वीकारण्याबाबतचा अंतिम निर्णय या कार्यालयाचे विभाग प्रमुख यांचा राहिल.

१०. दरपत्रक स्वीकृती तारखेपासून झेरॉक्स मशिन यांचा वार्षिक देखभाल करार करण्याबाबत पुढील अटी व शर्तीची पुर्तता करणे आवश्यक आहे.

१) झेरॉक्स मशीन सुस्थितीत ठेवण्यासाठी प्रत्येक महिन्याचे पहिल्या सोमवारी, सुट्टी असल्यास मंगळवारी कार्यालयास भेट देणे आवश्यक आहे. या व्यतिरिक्त मशिनमध्ये काही बिघाड झाल्यास कॉल केल्यावर त्वरीत कार्यालयात येऊन जाणे आवश्यक आहे.

२) दर महिन्याला कार्यालयातील भेट दिल्यावर त्याची कार्यालयात नोंदवही ठेवण्यात येईल मशिनची तपासणी केल्यावर तंत्रज्ञाची व कार्यालयाच्या अधिकाऱ्यांची स्वाक्षरी बंधनकारक आहे.

३) जी व्यक्ती कंपनीतर्फे येणार आहे. त्यांचेकडे कंपनीचे प्राधिकारपत्र असणे बंधनकारक आहे.

४) प्रत्येक भेटीच्या वेळेस नोंदवहीत झेरॉक्स कॉपीची नोंद घेणे अपेक्षित आहे.

५) दर तीन महिन्यांनी वार्षिक देखभाल कराराअंर्तगतचे त्रैमासिक देयक प्रदान करण्यात येईल. वार्षिक देखभाल करारामध्ये काही अडचणी उद्‌भवल्यास त्याबाबत अंतिम निर्णय महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचा राहिल.

तरी मुद्दा क्र. १० मधील १ ते ५ अटी व शर्ती मान्य असेल तर निविदाकराच्या दरपत्रकाबाबत विचार करण्यात येईल.

13/03/2026

(अरुण पाटील)
अपर पोलीस अधीक्षक (मुख्या-२)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

सर्व इच्छुक कंपन्या.

प्रत कार्यवाहीस्तव

पोलीस उप अधिक्षक, वेब शाखा, लाप्रवि, म. राज्य, मुंबई.

२/- उपरोक्त पत्राची प्रत सोबत जोडली असून, सदरचे पत्र लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे संकेतस्थळावर दि. २२/०३/२०२६ पर्यंत प्रसिध्दी राहील याप्रमाणे प्रसिध्द करण्यात यावे.